# घरटरूातील पिलांना हवे पंखात बळ

नाव : वसंत नारायण बारी.
वय : 50 वर्ष– पुरफष
शिक्षण – नाही. धर्म – हिंदु
पत्ता मौजे उमरी ता. कळंब, जि. यवतमाळ.

कौटुबीक माहिती : सिंधुताई बसंत बारी ;पत्नीद्ध
वय 45 वर्ष शिक्षण 4 था वर्ग.



वसंता व सिंधुताई बारी
मूलीः कल्पना व वैशाली

वसंतराव हे आपल्या आई वडिलासोबत उमरी या गावी राहतात. यांचे वडील हे स्वातंत्र्य पूर्व काळापूर्वी जोडमोहा या गावातुन उमरी येथे वास्तवास आले. वडील हे एका पायाने अंपग होते त्यांचा मत्रत्यु 3 वर्षा पूर्वी दिर्घ आजराने झाला त्यांचे लग्न सुध्दा हे पायाने अंपग असलेल्या कौसाबाईशी झाले. त्यांना चार अपत्य झाले 1द्ध वंसत 2द्ध गुणवंत 3द्ध भालचंद्र 4द्ध तिखना हे 3 भाउफ व एक बहिन असून यानां कोणतेही अपंगत्व नाही सर्वाचे विवाह होउफन ते आपल्या घरी मोल मजूरी करफन राहतात.

वसंतराव यांचे लग्न हे सिंधुताई यांचेशी सन 1988 मध्ये झाले त्यांना 4 अपत्य झाले ते दोन मुली व दोन मुले अनुक्रमे 1द्धकल्पना 22 वर्ष 2द्ध वैशाली 18

वर्ष 3द्ध भुषण 16 वर्ष 4द्ध स्वप्नील 14 वर्ष. वसंतराव याच्याकडे शेती नसल्याने लग्ना आधी श्री राजेंद्र गांधी यांचे कडे 300+— रफ. सालाप्रमाणे कामास सरफवात केली. त्यांनी सन 2000 पर्यंत 18000+— रफ. सालदारा ने काम केले. हे सर्व कुटूंब आपल्या मुलासमवेत संसार करीत असतांना प्रथम मोठी मुलगी कल्पना ही 9—10 वर्षाची असेपर्यंत शाळा शिकत होती पण एके दिवशी तिचे हात पाय अंपग झाल्या सारखे झाले. त्यामुळे त्यांनी औषौधोपचार केला. सरकारी व खाजगी मध्ये उपचार करतांना त्यांना पूरेशे यश आले नाही तिची परिस्थिती हळूहळू वाढू लागली व तिला 7 वी मध्येच शाळा सोडून घरी राहावे लागले. या पाठोपाठ 2—3 वर्षात दुसरी मुलगी वैशाली हि सुध्दा 9—10 वर्षाची असतांना तिला कल्पना सारखे अपंगत्व आले. तिला सुध्दा 4 था वर्गा पासून शाळा सोडावी लागली. या पाठोपाठ मुलगा 9—10 वर्षाचा असतांना त्याचे सुरफवातीला 'एकाऐकी शरिरातील नसा अकडून आल्या, पाय ताठ झाले तो पौचावर चालू लागला नंतर बोटावर चालू लागला पण एक दिवशी चालणेच बंद झाले त्याला सुध्दा शिक्षण बंद करावे लागले. माझया कुटुंबातील मुलांना अचानक असे अपंगत्पव का आले, एकेमेकांचे पाहून हे सर्व अपंग झाले का, असे सिधुंताई गहिवरफन विचारतात.

अशा प्रकारे वसंतराव व सिंधुताई यांच्या वर समस्यांचा भडीमार झाला. यात त्यांची आर्थिक परिस्थिती मोजकीच, जेवढी मिळायचे तेवढे खर्च व्हायचे. या समस्या मध्ये यांना जशी व जिथुन जे माहिती मिळाली त्या आधारे त्यांनी आपल्या मुलांचा विचार करफन



कल्पना व वैशाली

त्यांना या झालेल्या समस्यातुन मुक्त करावयाचा प्रयत्न केला. त्यात त्यांनी दवाखान्या सोबत तांत्रिाक मांत्रिाक उपचार केला व त्यात त्यांची पफसवणूक झाली. मांत्रिाकाने त्यांन 2000+— रफ.घेउफन केसर दिले व आणखी औषधी मिळवुन लाडु करफन खायला दिले. पण मुलांना आलेल्या अपंगात्वात सुधारणा झाली नाही. या करीता सिंधूतांईनी वस्तू गहान ठेवून पैसे आणलेत.



कल्पना वसंत बारी

सध्या वसंतराव हे मुलांच्या सांभाळासाठी घरी राहतात व संध्याकाळी गावात गोळया बिस्कीटे विक्री करतात या कार्यासाठी त्यांचा लहान भुषण अपंग असूनही तिनचाकी सायकलच्या साहयांने सहकार्य करतो. यातुन यांना मासिक 1000+— महिना प्राप्त होते. सोबत सिंधुताई ;पत्नीद्ध हया मुजूरीला जातात त्यांना 100+— रोज, असे अंदाजे 20 दिवस प्रतीमाह प्राप्त होतात. त्यातुन मासिक मिळकत दोन हजार ते बाविसशे रफपये आठ महिने प्राप्त होते. यांचे वार्षिक उत्पन्न सर्वसाधारण जमा पाहता 30,000+— हजार होते यातुन त्यांचा खर्च हा किराणा 400—500 रफ., 400—500 रफ. विज बिल भरणा, धान्य वार्षिक गहु घेतात व नंतर दवाखाना, बाहेर गावी जाने—येणे सर्व वार्षचा खर्च 35000—40000+— रफ. होते. 30 किलो महिन्याचे बिपीएल व्दारा धान्य प्राप्त हाते. यांच्यावर काही लोकांचे उधार देने बाकी आहे.

मागच्या वर्षी सिंधुताई यांना टाईपफाइड झाला असतना त्या वर्षभर मजुरीला जाउफ शकल्या नाही. त्यावेळेस त्यांनी साधारण 5 ग्राम जवळ असलेले सोने

सोनाराकडे तारण ठेवले व 6000+— रफ.4 टक्यांने व्याजाने घेतले. परंत करतांना 2000+— व्याज मिळून एकूण 8000+— रफ.  मजूरी करफन जमा केलेले परत केले. यावेळेस सिध्दुताई म्हणतात. 'नातेवाईक संबध अडी अडचणीस नाही परंतू परके मदत करते.' यात दोन वर्षा पासून सिंधुताई हया बचत गटात आहे. त्यांनी आतापर्यत बचत गटाच्या माध्यतातून 500+— व 1000+— रफ. घेउफन परत केले.

सिंधुताई यांची मुलगी कल्पना ही 22 वर्ष युवती असून 50 टक्के अपगंत्व वैदयकिय प्रमाणीत आहे त्याच प्रमाणे वैशाली ही 65 टक्के व भुषन हा 80 टक्के अपगंत्व वैदयकिय प्रमाणीत आहे. यांना एका अंपग शाळेत शैक्षणीक वर्षापासून दोन वर्षे आधिच्या वर्गात घेतले व परंतु शिक्षकांनी त्यांना पुढे त्याच वर्गात शिकावयास सांगीतले तेव्हा आई वडीलांनी त्यांना वापस घरी आणले. बि.आर.सी. अंतर्गत यांना थ्रिव्हिलर प्राप्त झाली होती. पण त्या मोडकळीस झाल्या आहे सध्या भुषन जवळ ही तिनचाकी गाडी आहे.



वैशाली वसंत बारी

'कल्पना ही आपले स्वतःचे काम करण्याच्या प्रयत्न करते ;संडास बाथरफम, वैगेरेद्व वैशाली एक वर्षा आधी पोळा हया सणापर्यंत थोडी पफार भिंतीच्या सहारा घेउफन चालत असे पण आता काहीच करफन शकत नाही त्यामुळे वडील ;वसंतरावद्व हे घरीच राहून त्यांचेच सर्व आंघोळपाणी संडास बाथरफम करतात. त्याचप्रमाणे भुषन हा सुध्दा कधी कधी आपले कार्य करण्यास असमर्थ असतो त्यामुळे मल—मुत्रद्याने कपडे भरतात. मुलांचे सर्व कार्य सांभाळण्यासाठी वसंतराव हे 10 वर्षा पासून घरीच आहे.'

असे सिधुताई सांगते. अर्थात वसंतरावाची मजूरी ही बंद आहे. सिधुताई घरी आल्यावर सध्या ते संध्याकाळी पिंगर विक्री करतात.

वसंतरावांचे वडीलोपार्जीत घर 35रु10'350 स्कें‍अर पफुट चे घर असून 10रु10 स्वयंपाक खोली, 10रु15 मधली खोली असुन त्याला समोर पश्चिम दिशेने लागून बाथरफम व संडास आहे. हे 2002 च्या बिपीएल यादी नुसार 80 नंबरवर आहे. त्यांना 16 गुण आहे ते सध्या धरकुल योजने द्वारा घरकुल मागणी करीत आहे. त्यांचे घर हे अर्ध कच्चे असुन वर टिनाचे छत आहे.

वसंतराव यांनी मिळकत मिळण्यासाठी गावात छोटो हॉटेल टाकुन रोजगारात भर पाडण्यासाठी बॅकेकडे गेले पण त्यांना अर्थ साहारूय मिळु शकले नाही त्यांना सांगतले की, गाव डिपफॉल्डर आहे. आम्ही पैसे देउफ शकत नाही त्यांचे बॅक ऑपफ बडोदा मध्ये पती व पत्नी ते एकत्रिृात खाते आहे. त्यांचे कडे गावराणी कोंबडया आहे. त्यांचे अंडे मुलांना खायला देतात. व कोंबडया कधी विकतात व कधी घरी खतात. वर्षाला 1000–1500 रफ. प्राप्त होते. वैशाली ही सर्व गोष्टीसाठी आई–वडीलांवर अवलंबून आहे. आई–वडील तिला चारफन देतात व कल्पना व भुषण हे स्वतःहा जेवण करफ शकतात. मुलांना साधारण तिन वेळा जेवण देतात. व स्वतः दोन वेळा जेवण घेतात. आई–वडीलांची प्रकत्रती सर्वसाधारण आहे. वसंतराव बचत गटात नाही. कुटंबाचे कोणतेही विमा संरक्षण नाही. गावात दवाखान्याची सुविधा नाही. 10 किमी वर सरकारी दवाखाना आहे. तसेच दळणवळण सुविधा कमी आहे. मुलांना कधी दवाखान्यात नेणाचे असले तर त्यांच्याजवळ असणाृया एसटीच्या किंवा बसच्या पास सुविधाचा लाभ मिळत नाही.

निष्कर्ष : एकदंरित पाहता हया कुटुंबाची पार्श्वभुमी अपंगाची आहे. घरातील सहा पैकी तिन व्यक्ती अपंग आहे तर तिन चांगले आहे. त्यात अपंग हया दोन मुली आहे. एक हि कोणतेही स्वतःचे काम करण्यात असमर्थ आहे. त्यामुळे वडील हयांचा सांभाळासाठी आपली रोज मजुरी व सर्व कामे सोडुन घरी मुलांची देखभाल करत राहाते. यामुळे यांचे कुटुंबीक उत्पन्न कमी झाले व विविध अडचणी ला सामोरे जावे लागते. आई ही मजुरीला जाते. तिला 100+— रोजी प्राप्त होते. यामुळे यांचे मिळकत कमी व खर्च जास्त असल्यामुळे सिधुताई म्हणतात की, 'आम्ही मुलांसाठी खुप करतो, व होते नव्हते खर्च केले, आता रोज कमवणे व पोट भरणे. दवाखाना व मांत्रिाक, कबुतंर खाउफ घातले. यांनी जे सांगितले ते केले, व आता सोडुन दिले. नाही काही झाले तर डॉक्टर कडे 500+— रफ. घेते कुठे नेतो म्हटलं तर 2000+— रफ. लागते म्हणुन काही झाले तर जेवढे होते तेवढे गावांत करतो डॉक्टर ला 20+— रफ. देतो.' सध्या वैशालीची प्रकत्रती खालावत आहे. आरोग्याच्या दत्रष्टीने बघतले तर क्षय असण्याची संभवता आहे त्याबदद/ल त्यांना माहिती नाही. वारंवार गरज पडल्यास सोनाराकडे आपले भांडे ;सोनेद्ध गाहण ठेवतात. यांना योग्य बॉकिंग सुविधा माहित नाही. घरात गॅस नाही. 'गरीब माणसांले कुठं पैसे, गॅस भेटते' तिन मुले 20+—रफ. मासिक बचत गटात जमा करतात. कामाचा अभाव आहे. त्यांचाजवळ रोजगार हमी योजनेचे जॉब कॉर्ड आहे. पण काम मिळत नाही त्यामुळे ते जेवढे दिवस बाहेर काम मिळेल तेवढे करणे त्यातुन काही भिसी मध्ये जमा करणे व अडचण पडल्यास वेळेवर घेतात. बॅक दुर आहे. बॅकेत जाउफन पैसे केव्हा आणुन व केव्हा कामी पडेल तेव्हा काय करायचे सिधुताईचे व्ययक्तिक बॅक खाते नाही.

## जीवनन्नोती कार्यक्रमात उपलब्धी

कल्पनाची ईच्छा आहे की गावांत एखादे छोटेशे स्टेशनरी चे दुकान टाकुन तिथे सोदंर्य प्रसाधन व इतर महिलांच्या उपयुक्त गोष्टी ठेवून धंदा करता येईल त्याकरीता भांडवलाची आवश्यकता  आहे. ‘बाबा सामान येईल, आम्ही विकू’ ;तात्कळत बोलणेद्धअसे मुली सांगतात. करीता यांना भांडवल उपलब्ध केल्यास व त्यांच्या वडीलांच्या सोबत सहकार्याने कुटंबाचे जिवनमान उंचवण्यास मदत होईल. यांना विमा सुरक्षेचा लाभ मिळुण देणे आई—वडीलांचा रोजगार हमी योजनेचे लाभ मिळुन देणे, घरकुल योजनेचा लाभ यासाठी त्यांना विविध योजनेचे एकत्रिात करफन लाभ देणे अपंग व्यक्तीबदद/ल जनजागत्रती करणे. यामधुन अपंग व्यक्तींना जिवन जगण्यासाठी सहकार्य होईल व त्यांच्यासारख्या कुटंबांना कार्यक्रमाचा कार्यामधुन प्रेरणा मिळेल.

शिकलेले धडे+ पाठ

- अंधश्रध्देमूळे बृयाच चुकिच्या उपचारामूळे आजारी व्यक्ती व कुटूंबातील सदस्य आर्थिक व मानसीक त्रास सहन करतात.
- बॅंक, आरोग्य सुविधा व शासकीय योजना यांचा लाभ आवश्यक असूनही वेळेत व पुर्णपने मिळत नाही.
- वसंताजींची प्रतीकूल परिस्थितीतही जीवन जगण्याची जिदद त्यांचे हास्य व मुलांची काळजी यावरफन लवकरच ते चांगले जीवनमान जगतील या तिळमात्राही शंका नाही.

उपाय योजना :

- वैद्यकीय सुविधा  उपलब्ध करफन दिल्यास वैयक्तीक कामे मुलांना करता येतील व कुट्रूंब प्रमूख त्यांच्या आर्थिक उत्पन्न वाढीकरीता प्रयत्न करफ शकतील.
- बचत गट किंवा योजनेतून अल्प सहारूय मिळाल्यास स्टेशनरी दुकान चालवीण्याची मुलींची इच्छा आहे.
- जाणीज जागत्रती करफन सामीजीक व कौटूंबीक स्थिरता मिळण्यास सहारूयक होउफन व तांत्रीक मांत्रीक यांच्याकडे उपचार व खर्च कमी करफन कुटूबाचे सामाजीक स्थान उंचावण्यास मदत होईल.
- गावं समिती व तालुका पातळीवरील संस्था यांच्या विशेष मदतीने लघू उद्योग सुरफ करण्याकरीता प्रयत्न करणे.